# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते चिंध्रण सामाजिक सभागृहाचे भूमिपूजन

पनवेल (प्रतिनिधी) मुख्यमंत्री विशेष निधी व आमदार प्रशांत ठाकूर यांच्या स्थानिक विकास निधीतून शिरवली जिल्हा परिषद मतदारसंघातील विविध विकास कामांमधील चिंध्रण गावातील सामाजिक सभागृहाच्या बांधकामाचे भूमीपुजन येथील सारनाथ बुद्धविहार जवळ आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते रविवारी (दि.२)करण्यात आले.

पनवेल तालुक्यातील चिंध्रण गावामध्ये बांधण्यात येणाऱ्या सामाजिक सभागृहाच्या बांधकाम भूमीपुजन कार्यक्रमाप्रसंगी आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, या सभागृहाचा उपयोग समाजाच्या विकासासाठी तसेच सर्व सामान्यांच्या विधायक कार्यासाठी होईल याची काळजी येथील ग्रामस्थांनी घेतली पाहिजे. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा आदर्श समोर ठेऊन या सभागृहातून समाज प्रबोधन होईल याचीही दक्षता घेतली पाहिजे असे मत व्यक्त करून आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले की, सर्वसामान्यांपर्यंत शासनाच्या विविध योजना पोहोचाव्यात यासाठी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण साहेबांच्या मार्गदर्शनाखाली या योजनांची अंमलबजावणी केली जात आहे. या सभागृहासाठी १५ लाख रूपये विकास निधीची तरतूद करण्यात आली असून हे सभागृह ६ महिन्यांत पुर्ण होणार आहे अशी माहिती आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिली.

या कार्यक्रमास पनवेल तालुका कॉंग्रेसचे कार्याध्यक्ष अरूणशेठ भगत, जिल्हा परिषद सदस्य व पक्षप्रतोद राजेंद्र पाटील, शिरवली विभागीय अध्यक्ष शिवाजी दुर्गे, युवक कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष अमर पाटील, उद्योजक भार्गव ठाकूर, संतोष गोंधळी, नामदेव सोनावळे, देविदास गायकवाड, नरेश सोनावळे, संतोष सोनावळे, राजू सोनावळे , प्रकाश सोनावळे, बळीराम सोनावळे, यशवंत कांबळे, उमेश सोनावळे, नामदेव पाटील, सुरेश पाटील, प्रकाश पाटील, मोतीराम टेंभे, राजेंद्र बुवा पाटील, महादेव पाटील, तुषार दुर्गे, सुरज गडगे, एकनाथ पाटील, राघो पाटील, रमेश पाटील आदी मान्यवरांसह ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.